# ८. मोटार अपघात

**अपघात झाल्यानंतर नागरिकांनी खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.**

(१) अपघातामध्ये जर कोणीही जखमी झाले नसेल आणि केवळ मोटार वाहनांचे नुकसान झाले असेल, तेव्हा दोन्ही वाहनांच्या मोटार चालकांनी आपली वाहने रस्त्याच्या बाजूला घ्यावीत व वाहतुकीस अडथळा होणार नाही याची खबरदारी घ्यावी. दोन्ही वाहन चालकांनी एकमेकांचे नांव, पत्ता, अनुज्ञप्तीचा तपशील व मोटार वाहन क्रमांक लिहून घ्यावा व स्थानिक पोलीस ठाण्यात जाऊन रितसर तक्रार नोंदवावी. वाहनांच्या नुकसान भरपाईसाठी विमा कंपनीस कळवावे.

(२) जर अपघातामध्ये एखादा इसम जखमी झाला असेल तर नागरिकांनी शक्य असेल तर जखमी इसमास जागेवरच प्रथमोपचार द्यावा. जखमी इसमास तावडतोब रुग्णालयात हलविण्याची व्यवस्था करावी. ज्या वाहनाने अपघात केला त्याचा रजिस्टर नंबर व वाहन चालकाचे नांव व इतर तपशील याची नोंद करून तावडतोब जवळच्या पोलीस ठाण्यास कळवावे.